# लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालया च्या उद्योजकता विभागाची शैक्षणिक सहल

लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालया च्या उद्योजकता विभागाची शैक्षणिक सहल दिनांक 26 मे 2023 रोजी वडजी येथील श्री खंडोबा ॲग्री प्रोडूसर कंपनी लिमिटेड वडजी या ठिकाणी पार पडली वडजी येथील प्रगतशील शेतकरी श्री उमेश मेत्रे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रकल्पाला भेट देण्यासाठी महाविद्यालयामधून 45 विद्यार्थी व तीन प्राध्यापक यांनी भेट दिली या प्रकल्पाचे वैशिष्ट्ये म्हणजे गुलाबाच्या रोपाच्या लागवडीपासून ते गुलाबजलाच्या निर्मितीपर्यंतचा संपूर्ण प्रवास हा सेंद्रिय पद्धतीने केला जात असल्याचे शेतकरी उमेश मित्रे यांनी सांगितले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सतीश कुमार देवकर यांच्या सूचनेनुसार व मार्गदर्शन नुसार ही शैक्षणिक सहल पार पडली यासाठी उद्योजकता विभाग प्रमुख  प्रा सौ श्रीदेवी खांडेकर मॅडम व प्रा अक्षरा कवडे मॅडम यांनी परिश्रम घेतले

